**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट शिथिल करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

**शासन परिपत्रक** क्रमांक: ग्रापाधो १११२/ प्र. क्र.८५/पापु-०७,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दि. ०४ मे, २०१२

**वाचा** : १. शा.नि.पा.पु.व स्व.वि.क्र.ग्रापायो ११०९/प्र.क्र.१०४(अ)/ पापु ०७ .दि.१७/३/२०१०

२. शासन परिपत्रक क्रमांक: ग्रापाधो ११११/ प्र. क्र.२०३/ पापु-०७, .२१/१२/२०११

३. शासन परिपत्रक क्रमांक: ग्रापाधो ११११/ प्र. क्र.२०३/ पापु-०७, .१५/०३/२०११

**प्रस्तावना:**

संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये नवीन पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव तयार करताना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असणे व योजनेकरीता अनुदानाचा दुसरा हप्ता मिळण्यापुर्वी गाव १०० टक्के हागणदारी मुक्त असणे आवश्यक आहे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र.२ येथील शासन परिपत्रकान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा प्रस्ताव तयार करतांना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट तसेच प्रगतीपथावरील योजनांना शासन हिश्श्याचा दुसरा हप्ता वितरीत करण्यासाठी विहित करण्यात आलेली १०० टक्के हागणदारी मुक्तीची अट दि.३१ जानेवारी, २०१२ पर्यंत शिथिल करण्यात आली होती. तर, संदर्भ क्र.३ येथील शासन परिपत्रकान्वये, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा प्रस्ताव तयार करतांना संबंधित गाव ६० टक्के हागणदारी मुक्त असण्याची अट दि.३१ मार्च, २०१२ पर्यंत शिथिल करण्यात आलेली होती.

राज्यात सध्या निर्माण झालेली पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेता ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर्स लागलेले आहेत, किंवा लागण्याची शक्यता आहे, अशा गावांमधील, नळ पाणी पुरवठा योजनांची अमंलबजावणी वेगाने करता यावी जेणे करून अशा गावांमध्ये कायमस्वरुपी पिण्याच्या पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध होईल व भविष्यात टँकर्स लावण्याची गरज भासणार नाही. याबाबीचा विचार करून, अशा गावांमधील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी निधीच्या तिनही हप्त्यांच्या अदायगीसाठी गाव / वाडी हागणदारी मुक्त असण्याची अट काही कालावधीपर्यंत शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन परिपत्रक :**

उपरोक्त परिस्थितीचा विचार करून ज्या गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर्स लागलेले आहेत, किंवा लागण्याची शक्यता आहे, अशा गावांमधील, नळ पाणी पुरवठा योजनांची अमंलबजावणी वेगाने करता यावी यासाठी, या गावांमधील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी निधीच्या तिनही हप्त्यांच्या अदायगीसाठी गाव / वाडी हागणदारी मुक्त असण्याची अट दि. १५ जून, २०१२ पर्यंत शिथिल करण्यात येत आहे. मात्र, ज्या योजनांमध्ये स्त्रोताचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे, अशा योजनांवर पुढील खर्च करण्यापुर्वी स्त्रोतात पाणी उपलब्ध असल्याबद्दल खात्री करून घ्यावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद यांनी जिल्ह्यातील ज्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना या सवलतीचा फायदा घेतील अशा गावांमध्ये माहिती, शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम प्राधान्याने घेऊन ही गावे १०० टक्के हागणदारी मुक्त होतील याची दक्षता घ्यावी. अतिरिक्त संचालक, पाणी स्वच्छता व सहाय्य संस्था यांनी वरीलप्रमाणे झालेल्या कार्यवाहीचा आढावा अधिक्षक अभियंता, भारत निर्माण यांचेकडून घेऊन अहवाल शासनास सादर करावा.

३. या परिपत्रकानुसार हागणदारी मुक्तीची अट दि. १५ जून, २०१२ पर्यंत शिथिल करण्यात यावी. त्यानंतर प्रचलित धोरणानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी हागणदारी मुक्तीची अट व अनुदान वितरणाची पध्दत कायम राहील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असू त्याचा संगणक सांकेतांक **२०१२०५०४१११५४५१८००** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

सही/-

**(र.अ.खडसे)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्य मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व विधान सभा / विधान परिषद सदस्य
सदस्य सचिव,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,मुंबई
संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे,
संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था,बेलापूर ,नवी मुंबई
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व अधिक्षक अभियंता, विभागीय भारत निर्माण कक्ष
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,जिल्हा परिषद
महालेखापाल,महाराष्ट्र - १ मुंबई(लेखा परिक्षा/ लेखा व आज्ञेयता)
महालेखापाल,महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता
सर्व प्रादेशिक उपसंचालक,भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व गट विकास अधिकारी,पंचायती समिती
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई
पाणी पुरवठा विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निविड नस्ती,पापु-०७